गुरुवार, दि. ५ फेब्रुवारी २०२६ ● जालना ● वर्ष ७ वे ● अंक १५७ वा ● किमंत २ रु. ● पाने ०४
8390098886 yuva.aadarsh@gmail.com 8390048886

विघ्नहर्ता हॉस्पिटल
टेंभुर्णी ता.जाफ्राबाद जि.जालना (मेन रोड)
मोरया मेडीकल अँण्ड जनरल स्टोअर्स
MEDICAL टेंभुर्णी ता.जाफ्राबाद जि.जालना (मेन रोड)
एक वेळ अवश्य भेट द्या
डॉ. आनंद भाले Mob. 8208427524
प्रो.प्रा. विशाल देशमुख Mob. 7770084597

https://yuvaadarsh.com

# युवा आदर्श

संपादक : दीपक श्रीकृष्ण शेळके

https://facebbook.com/yuva.aadarsh/ https://youtube.com/@Yuva_Aadarsh/ https://twitter.com/Yuva_aadarshjln/ RNI: MAHMAR/2019/78282

## जालना मनपात महापौर व उपमहापौर निवडीसाठी नामनिर्देशन प्रक्रियेला सुरुवात

**जालना । प्रतिनिधी -** जालना शहर महानगरपालिकेतील महापौर व उपमहापौर निवडीसाठी नामनिर्देशनपत्रे वितरित करण्याचा कार्यक्रम जाहीर करण्यात आला असून दिनांक ०४ फेब्रुवारी २०२६ ते ०५ फेब्रुवारी २०२६ या कालावधीत नामनिर्देशनपत्रांचे वितरण केले जात आहे.

**महापौर पदासाठी १० तर उपमहापौर पदासाठी ८ नामनिर्देशनपत्रांचे वितरण**

या कार्यक्रमाअंतर्गत आज दिनांक ०४ फेब्रुवारी २०२६ रोजी दुपारी ३.०० वाजेपर्यंत महापौर पदासाठी एकूण १० नामनिर्देशनपत्रांचे वितरण करण्यात आले असून उपमहापौर पदासाठी ८ नामनिर्देशनपत्रे वितरित करण्यात आली आहेत. अशी माहिती नगरसचिव तथा सहायक आयुक्त, जालना शहर महानगरपालिका यांनी दिली आहे. महापौर पदासाठी नामनिर्देशनपत्रे घेतलेल्या उमेदवारांची नावे पुढीलप्रमाणे रमेश गौरक्षक ४ नामनिर्देशनपत्रे, महेश निकम ४ नामनिर्देशनपत्रे, श्रीमती. रिमा खरात २ नामनिर्देशनपत्रे तसेच उपमहापौर पदासाठी नामनिर्देशनपत्रे घेतलेले उमेदवार रमेश गौरक्षक ४ नामनिर्देशनपत्रे, महेश निकम ४ नामनिर्देशनपत्रे महापौर व उपमहापौर पदाच्या निवडीसाठी सुरू झालेल्या या प्रक्रियेमुळे जालना शहरातील राजकीय वातावरण तापले असून विविध पक्षांकडून हालचालींना वेग आला आहे. इच्छुक उमेदवारांकडून जोरदार लॉबिंग सुरू असून संख्याबळाची गणिते जुळवण्याचे प्रयत्न सुरू असल्याचे दिसून येत आहे.

महानगरपालिकेतील सत्तासंघर्षाच्या पार्श्वभूमीवर कोण महापौर व उपमहापौरपदी विराजमान होणार, याकडे संपूर्ण शहराचे लक्ष लागले आहे. ०५ फेब्रुवारीपर्यंत नामनिर्देशनपत्र वितरणाची प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर पुढील टप्प्यात नामनिर्देशनपत्रांची छाननी, माघार आणि मतदान कार्यक्रम जाहीर होण्याची शक्यता आहे. एकूणच जालना मनपातील सत्तास्थापन प्रक्रियेला वेग आला असून आगामी काही दिवसांत राजकीय घडामोडी अधिकच तीव्र होण्याची चिन्हे आहेत.

# महाराष्ट्रचा विकास हाच भारताचा विकास; अर्थसंकल्पातून स्पष्ट

## माजी केंद्रीय राज्यमंत्री रावसाहेब दानवे

**जालना । प्रतिनिधी -** पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्त्वात अर्थमंत्री निर्मला सितारमण यांनी अर्थसंकल्प मांडला यात रेल्वे, रस्ते, उद्योग, कृषिसाठी भरीव तरतूद करण्यात आली असून काँग्रेसच्या ६५ वर्षांच्या कार्यकाळात जेवढी तरतूद करण्यात आली नाही तेवढी तरतूद यंदाच्या अर्थसंकल्पात करण्यात आली असल्याचे माजी केंद्रीय राज्यमंत्री रावसाहेब दानवे यांनी म्हटले आहे. त्याच बरोबर जालना, मराठवाडा आणि महाराष्ट्रासाठीही मोठ्या प्रमाणात तरतूद करण्यात आल्याने महाराष्ट्रचा विकास हाच भारताचा विकास असल्याचे अर्थसंकल्पातून दिसून येत आहे.

जालना येथे भाजपा कार्यालयात बुधवार (दि ४) रोजी आयोजित पत्रकार परिषदेत श्री दानवे बोलत होते. यावेळी आमदार नारायण कुचे, भास्कर दानवे, राजेश राऊत यांची उपस्थिती होती.

श्री दानवे म्हणाले की, जितक्या लवकर जमीन संपादन होईल तेवढ्या लवकर जालना-जळगाव रेल्वे मार्ग होईल असा विश्वास माजी केंद्रीय मंत्री रावसाहेब दानवेंनी व्यक्त केला आहे. जालना-बदनापूर-सिल्लोड मार्गे हा महामार्ग होणार असून अनेक ठिकाणी भूसंपादन झालेलं आहे.या रेल्वे मार्गाच्या भूसंपादनाच्या ठिकाणी जमीन खरेदी विक्रीला बंदी घालण्यात आली आहे.त्यामुळे जेवढ्या लवकर या महामार्गासाठी जमीन संपादन होईल तेवढ्या लवकर हा महामार्ग होईल असा विश्वास दानवेंनी व्यक्त केला. या महामार्गासाठी अर्थ संकल्पात ५ हजार ८०० कोटींची आर्थिक तरतूद करण्यात आली असून आता या कामाला वेग येणार असल्याचे दानवे म्हणाले. मुंबई नागपूर समृद्धी महामार्गालगत कॅरोडॉर झाला असता मात्र जिल्ह्याचे संसदेत प्रतिनिधित्व करणारे लोकप्रतिनिधी यांना कॅरीडॉर समजतो की नाही याबाबत मला शंका आहे. त्यांनी एकदा माझ्या जवळ येऊन बसावे असा टोला माजी मंत्री रावसाहेब दानवे यांनी खासदार कल्याण काळे यांना हाणला आहे.




ते म्हणाले, राज्यातील रेल्वे प्रकल्पांसाठी सुमारे २३,७७८ कोटी रुपयांचा विक्रमी निधी जाहीर करण्यात आला आहे. काँग्रेसच्या २००९ ते २०१४ च्या काळात सरासरी वार्षिक ११७१ कोटी रुपये हा निधी होता. म्हणजेच या निधीत जवळपास २० पटींनी वाढ झाली आहे.

मुंबई पुणे हायस्पीड कॉरिडॉर प्रकल्प प्राथमिक टप्प्यात असून यासाठी ५ हजार कोटी रुपये तरतूद, १३२ रेल्वे स्थानकांचा पुनर्विकास अमृत भारत स्थानक योजनेतंर्गत केला जाणार आहे. मुंबई लोकलच्या विस्तारीकरणासाठी आणि आधुनिकीकरणासाठी सुमारे १२०० कोटी रुपयांचा अतिरिक्त निधी दिला आहे. नवीन रस्ते व राष्ट्रीय महामर्गासाठी १५००० कोटी रुपयांपेक्षा जास्त निधी प्रस्तावित आहे. कोकण कनेक्टिव्हिटीसाठी सागरी महामर्गाच्या कामाला गती देण्यासाठी विशेष तरतूद करण्यात आल्याचेही श्री दानवे यांनी सांगितले.

पुण्यातील इलेक्ट्रॉनिक्स आणि सेमीकंडक्टर क्लस्टरसाठी ८ हजार कोटी रुपयांची विशेष सवलत आणि पायाभूत सुविधा निधी. पालघर या महत्त्वकांक्षी बंदराच्या कामासाठी आणि कनेक्टीव्हिटीसाठी २५०० कोटी रुपयांची तरतूद यामुळे महाराष्ट्राची निर्यात क्षमता दुपटीने वाढणार आहे.

कृषि आणि ग्रामीण महाराष्ट्रसाठीही भरीव तरतूद करण्यात आली असून काजू आणि नारळ प्रक्रिया उद्योगांना चालना देण्यासाठी ५०० कोटी रुपयांचे विशेष पॅकेज सिंचनासाठी ३५०० कोटी रुपये दिले आहे.

२५ लाख महिलांना लखपती दीदी बनविण्याचे उद्दिष्ट ठैवले असून त्यासाठी कौशल्य विकासासाठी निधी वाढविला आहे.

महाराष्ट्रात तीन नवीन सरकारी वैद्यकीय महाविद्यालये आणि रुग्णालये उभारण्यासाठी निधी, तसेच राज्यातील ३६ जिल्ह्यात सरकारी वसतिगृह उभारणीसाठी १ हजार कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली.

मराठवाडयाला रेल्वे, पाण्यासाठी मराठवाडा वॉटर ग्रीडसाठी आर्थिक तरतूद, जालना जळगाव ५ हजार ८०४ कोटी रुपये मंजूर करण्यात आले. छत्रपती संभाजीनगर नविन इंडस्ट्रीयल टाऊनशिपसाठी विशेष निधी, नांदेड वर्धा रेल्वेसाठी ३४४५ कोटी दिले आहे.

हा अर्थसंकल्प महाराष्ट्रचा विकास हाच भारताचा विकास आहे हे स्पष्ट करतो आहे. काँग्रेसच्या काळात फक्त कागदावरचे प्रकल्प आता मोदीजींच्या काळात जमिनीवरचे वास्तव बनले आहेत. हा अर्थसंकल्प महाराष्ट्राला आर्थिक महासत्ता बनविणारा ठरणार असल्याचे श्री दानवे यांनी शेवटी म्हटले आहे.

दरम्यान या अर्थसंकल्पात सर्व क्षेत्रांसाठी आर्थिक तरतूद करण्यात आली असून या अर्थसंकल्पाचं स्वागत करतो असं दानवेंनी सांगितलं.

युवा आदर्श

## जमीन दोस्त ...

बळकावया आवडे
जमीन माझी दोस्त
विरोधात उभे कुणी
करतो जमीन दोस्त
जमीन वाटे सर्वोच्च
व्यसन हे जबरदस्त
स्वर्गदोनबोटे जवळ
नावावरी होता दस्त
देत नाही दाद काही
असे विचित्र भिडस्त
विकत नाही आईस
सौदा असूनही रास्त
जे जे ऐकती सांगणे
ठेवू सगळी बडदास्त
नाही म्हणायां छाती
जगणे होई दुरापास्त
सौदा महागाचा करा
ज्यांनाजीव हो स्वस्त
वाकवू शके लोखंडा
नकाराहू हो मदमस्त
चुकभले केलीआधी
अजून करावी दुरुस्त
खाऊन बसे भक्ष्यांस
जसेअजगर पडेसुस्त
मालामाल व्हा सगळे
पेमेंट करी एककिस्त
आम्हीचं खरे मालक
पाळाया हवीयं शिस्त
जेजे आमच्या बाजूने
जीवनजगेलं आश्वस्त
नका करुत विरोध रे
मरणेही होई अस्वस्थ

**हेमंत मुसरीफ पुणे**
9730306996.

# संघटनेतील आर्थिक पारदर्शकतेवर गंभीर आरोप; सभासदांच्या हक्कांसाठी लढाई प्रमोद तोतला यांचा थेट हल्ला

## हिशोब, व्हाउचर व वार्षिक सभांचा अभाव; पदाधिकाऱ्यांवर दिशाभूल केल्याचा आरोप

**जालना । प्रतिनिधी -** स्थानिक व्यापारी व सामाजिक संघटनेतील अंतर्गत वाद आता उघड संघर्षात रूपांतरित झाला असून संघटनेच्या आर्थिक व्यवहारांवर गंभीर प्रश्नचिन्ह उपस्थित करण्यात आले आहे. संघटनेतील सक्रिय सदस्य प्रमोद तोतला यांनी सध्याच्या पदाधिकाऱ्यांवर थेट आरोप करत ''सभासदांची अनेक वर्षे दिशाभूल केली जात असून खोटारडेपणाची हद्द झाली आहे'' असा घणाघात केला आहे.

प्रमोद तोतला यांनी स्पष्ट केले की, ही कोणतीही वैयक्तिक लढाई नसून सर्व सभासदांच्या हक्कासाठीची लढाई आहे. ''मी फक्त हिशोब मागतोय, तेवढा द्या. ज्याला कर नाही त्याला डर नाही. जर व्यवहार स्वच्छ असतील तर आजपर्यंत व्हाउचर व कागदपत्रांसह हिशोब आमच्या तोंडावर मारून दाखवला असता,'' असे ते म्हणाले.

**तीन वर्षांचा कार्यकाळ, पण दहा वर्षांपासून निवडणूक नाही?**

तोतला यांनी संघटनेच्या कार्यपद्धतीवर बोट ठेवत सांगितले की, घटनेनुसार कार्यकाळ तीन वर्षांचा असताना गेल्या तब्बल दहा वर्षांपासून निवडणूक घेतली गेलेली नाही. तसेच एकही वार्षिक सर्वसाधारण सभा () घेण्यात आलेली नसून कोणत्याही वर्षाचा आर्थिक हिशोब सभासदांसमोर सादर करण्यात आलेला नाही. ''असे असूनही पदाधिकारी सांगतात की सर्व काही नियमानुसार सुरू आहे. आधी घटनेचा अभ्यास करा, मग बोलावे,'' असा टोला त्यांनी लगावला.

**ईसी सर्क्युलरबाबत 'ओपन चॅलेंज'**

पदाधिकाऱ्यांकडून प्रत्येक तीन महिन्यांच्या मीटिंगमध्ये हिशोब सादर केला जातो, असा दावा केला जातो. यावर तोतला यांनी खुले आव्हान दिले आहे. ''तुम्ही जे कार्यकारिणी चे सर्क्युलर दाखवता, त्यातील कोणत्या सर्क्युलरमध्ये आर्थिक विषयाचा उल्लेख आहे ते सार्वजनिक करा,'' असे आव्हान त्यांनी दिले. तसेच 'कोरम पूर्ण झाला नाही तर' अशा मूलभूत शब्दलेखनातही चूक होत असल्याचे नमूद करत, संघटना चालवण्यासाठी किमान ज्ञान आणि जबाबदारी आवश्यक असल्याचे त्यांनी सांगितले.

**व्यवसाय रचनेवरही सवाल**

तोतला यांनी काही पदाधिकाऱ्यांच्या व्यवसायांबाबतही गंभीर आरोप केले. काही पार्टनरशिप फर्मना 'प्रायव्हेट लिमिटेड' किंवा 'एलएलपी' म्हणून सादर करून सभासदांची दिशाभूल केली जात असल्याचा आरोप त्यांनी केला. ''नुसते नाव लावले म्हणजे कंपनी प्रायव्हेट लिमिटेड किंवा एलएलपी होत नाही. त्यासाठी ठराविक कायदेशीर नियम व नोंदणी आवश्यक असते,'' असे त्यांनी स्पष्ट केले.

**पत्रांना उत्तर नाही, म्हणून सार्वजनिक भूमिका**

संघटनेला आणि पदाधिकाऱ्यांना अनेक वेळा लेखी पत्रव्यवहार करूनही कोणतेही उत्तर मिळाले नसल्याचा आरोप करत तोतला म्हणाले की, याच कारणामुळे आम्हाला सार्वजनिक पातळीवर भूमिका मांडावी लागत आहे. ''आमच्या पत्रांचेच नाही तर वरिष्ठ नेत्यांच्या पत्रांनाही केराची टोपली दाखवली गेली,'' असा गंभीर आरोप त्यांनी केला.

**माध्यमातील बातमीवर आक्षेप**

एका विभागीय वृत्तपत्रात साईनाथ पवार यांनी दिलेल्या बातमीवरही तोतला यांनी आक्षेप घेतला असून, ''आम्ही पराभूत मानसिकतेतून बदनामी करत आहोत असे लिहिणे म्हणजे वस्तुस्थितीचा विपर्यास आहे,'' असे त्यांनी म्हटले.

**पारदर्शकतेची मागणी तीव्र**

एकूणच हा वाद आता पारदर्शकता, उत्तरदायित्व आणि लोकशाही मूल्यांवर केंद्रित झाला आहे. सभासदांच्या पैशाचा हिशोब, निवडणुका व वार्षिक सभा तातडीने घ्याव्यात, अशी ठाम मागणी तोतला व त्यांच्या समर्थकांकडून करण्यात येत आहे. ''भगवान के घर देर है, पर अंधेर नहीं,'' असा इशारा देत प्रमोद तोतला यांनी सत्य बाहेर येणारच, असा विश्वास व्यक्त केला आहे.

# पर्यावरणातील बदलांमुळे पिकांवर रोगराई - डॉ उमेश मोगले

**जालना । प्रतिनिधी -** सततच्या पर्यावरणातील बदलामुळे पिकांवर अनेक प्रकारचे परिणाम होऊन रोगराई पसरत आहे त्यामुळे उत्पादनात घट होताना दिसते असे प्रतिपादन मांडवा येथे जे इ एस महाविद्यालयच्या विशेष श्रम संस्कार शिबिरात प्रा डॉ उमेश मोगले यांनी केले.

जेइएस महाविद्यालय जालनाच्या राष्ट्रीय सेवा योजना विभागातर्फे मांडवा येथे विशेष श्रमसंस्कार शिबिराचे आयोजन दि २९ जानेवारी ते ४, फेब्रुवारी २०२६, दरम्यान करण्यात आले आहे, सहाव्या दिवशी बौद्धिक क्षेत्रात पर्यावरणातील बदल व शेती या विषयावर वनस्पती शास्त्र विभाग प्रमुख प्रा. डॉ. उमेश मोगले यांच्या विशेष व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी कार्यक्रमाचे अध्यक्षपदी प्रा.डॉ. विलास जाधव होते. व्यासपीठावर प्रा. डॉ.वसंत पवार यांची उपस्थिती होती.

यावेळी बोलताना प्रा. डॉ. मोगले म्हणाले की, सततच्या वातावरणातील बदलामुळे शेतीतील पिकांवर अनेक प्रकारचे रोग पडत असून त्यामुळे पिकांच्या उत्पन्नात घट होत आहे अतिवृष्टीमुळे शेतकऱ्यांचे मोठ्या प्रमाणावर नुकसान होते. पिकावर पडणाऱ्या विविध रोगांची त्यांनी माहिती दिली असून त्यावर उपाययोजना काय करावी त्यांनी सांगितले. पॅकिंग फूड चांगले आहे काय याची खात्री करूनच ते खावे असेही डॉ. मोगले यांनी सांगितले.

अध्यक्षीय समारोप करताना प्रा. डॉ. जाधव **पान २ वर**




सार्वजनिक शिवजयंती उत्सव समिती २०२६ जाहीर

# अध्यक्षपदी अतुल हजारे पाटील तर सचिवपदी नामदेव गोरे

**परतूर । प्रतिनिधी -** शहरात सर्व पक्षीय छत्रपती शिवाजी महाराज जयंतीनिमित्त उत्सव समिती बैठक घेण्यात आली या मध्ये सर्वानुमते समिती जाहीर करण्यात आली असून समितीच्या अध्यक्षपदी अतुल हजारे तर सचिवपदी नामदेव गोरे यांची निवड करण्यात आली. परतूर येथील शासकीय विश्रामगृहात शिवजन्मोत्सव समिती निवड करण्यासाठी तालुक्यातील सर्वपक्षीय व सर्व संघटनेचे पदाधिकारी यांची बैठक आयोजित करण्यात आली होती. या बैठकीत समितीतिच्या उपाध्यक्षपदी विठ्ठल सोनपावले, विशाल शिंदे, सहसचिव रफिक सतार कुरेशी, कार्याध्यक्ष , विकास मोरे, कोषाध्यक्ष आकाश काळे, प्रवीण प्रधान तर संघटक म्हणून गोपी ठाकूर, प्रवीण पेडगावकर यांची निवड करण्यात आली. सल्लागार म्हणून सावता काळे, अर्जुन राठोड, संभाजी घनवट, अर्जुन जगताप, ॲड सुरेश काळे, नरेश कांबळे, सिद्धेश्वर लहाने, विजय यादव यांच्यासह अनेकांची उपस्थिती होती. ही बैठक विठ्ठल बरकुले राष्ट्रवादी जिल्हा संघटक यांच्या





अध्यक्षतेखाली संपन्न झाली. यावेळी संदीप बाहेकर, प्रकाश चव्हाण, डॉ. प्रदीप सातोणकर, रमेश भापकर, शत्रुघ्न कणसे, संपत टकले, इजरान कुरेशी, रज्जाक कुरेशी, सतीश सोनवणे यांची प्रमुख उपस्थिती होती. ज्येष्ठ मार्गदर्शक विजय नाना राखे, विनायक काळे, शहाजी राक्षे, पांडुरंग नवल, अविनाश शहाणे, बाबाजी गाडगे, ओमकार काटे, बाबुराव हिवाळे, मोइन कुरेशी, अखिल काजी, कदीर कुरेशी, राजेश भुजबळ, अशोक तनपुरे, संतोष हिवाळे यांच्यासह पत्रकार बांधव सर्व पक्षाचे प्रमुख सर्व संघटनेचे प्रमुख मार्गदर्शक म्हणून राहणार आहे.

# संपादकीय पान

## पाकिस्तानात बलुच आणि सिंध प्रांतात स्वातंत्र्यासाठी आंदोलन

पाकिस्तानच्या बलुचिस्तानमध्ये स्वतंत्र बलुचिस्तानसाठी बलुचिस्तानी नागरिकांनी सरकारविरोधात एल्गार पुकारून सरकारला आवाहन दिले आहे. बलुच लिबरेशन आर्मीने पाकिस्तानी लष्कराविरुद्ध लढा पुकारून स्वतंत्र बलुचिस्तानची घोषणा देखील केल आहे. मागील काही महिन्यांपासून बलुच लिबरेशन आर्मी आणि पाकिस्तानी लष्कर यातील संघर्ष वाढत चालला आहे. आताही तिथे मोठा हिंसाचार चालू असून बलुच नॅशनल आर्मीने बलुचिस्तान मधील काही भूभाग बळकावला असल्याची बातमी वाचायला मिळाली. बलुच आर्मी आणि पाकिस्तानी लष्कर यांच्यात तिथे तुंबळ लढाई सुरू असून बलुचिस्तान लिबरेशन आर्मीशी लढताना पाकिस्तान लष्कराला लष्कराला अक्षरशः नाकेनऊ आले आहे. सीमेवर भारतीय लष्कराशी आणि सीमेच्या आत बलुचिस्तान लीबरेशन आर्मीशी लढताना पाकिस्तान अक्षरशः भिकेकंगाल झाला आहे. पाकिस्तानची अर्थव्यवस्था रसातळाला गेल्याने पाकिस्तान जगात भिकेचा कटोरा घेऊन फिरत आहे. आंतरराष्ट्रीय नाणेनिधीने पाकिस्तानला निधी दिला असला तरी त्यासाठी अनेक अटी घातल्या आहेत. पाकिस्तानात महागाई इतकी वाढली आहे की पाकिस्तानी नागरिकांना एकवेळचे जेवण मिळणे देखील मुश्किल झाले आहे. महागाईने जनता मेटाकुटीला आली आहे. त्यात भारताने सिंधू जल करार स्थगित केल्याने पाकिस्तानी नागरिकांवर पाण्यासाठी वणवण फिरण्याची देखील वेळ आली आहे. जर भारताने हा जल करार पूर्ववत केला नाही तर भविष्यात पाकिस्तानात मोठी पाणीबाणी निर्माण होऊ शकते यावर तोडगा म्हणून पाकिस्तानच्या शरीफ सरकारने ग्रीन पाकिस्तान इनिशीएटीव्ह हा महत्वाकांक्षी प्रकल्प हाती घेतला. सुमारे साडेतीन हजार कोटी रुपयांचा हा प्रकल्प चीनच्या मदतीने पकिस्तान साकारणार आहे. या प्रकल्पास पाकिस्तानची दुसरी हरित क्रांती संबोधली जातेय. या प्रकल्पाअंतर्गत पाकिस्तानातील चेलिस्तान वाळवंटातील सुमारे ४८ लाख एकर जमीन सिंचनाखाली येणार आहे. त्यासाठी शेकडो किलोमिटरची सहा कालवे काढण्यात येणार आहे. या प्रकल्पाकडे पाकिस्तान सरकारचा ड्रीम प्रोजेक्ट म्हणून पाहण्यात येत आहे मात्र हाच प्रकल्प आता पाकिस्तानसाठी डोकेदुखी बनला आहे कारण या प्रकल्पाने सिंध प्रांतात येणारे पाणी पंजाब प्रांतात वळवले जाईल असे सिंध प्रांतातील नागरिकांना वाटते. आपल्या हक्काचे पाणी पंजाब प्रांताला मिळणार असल्याने सिंध प्रांतातील नागरिक प्रचंड अस्वस्थ आहेत या अस्वस्थतेतूनच तेथील नागरिक रस्त्यावर उतरून पाकिस्तान सरकारविरुद्ध आंदोलन करत आहेत. भारत आणि बलुचिस्तान आर्मी पुढे हतबल झालेल्या शरीफ सरकारपुढे ही नवी डोकेदुखी उभी ठाकली आहे. पाकिस्तानातील सिंध प्रांतातील लोकही आता सरकारच्या विरोधात रस्त्यांवर उतरून आंदोलने करीत आहेत. हे आंदोलन देखील हिंसक बनले आहे. काही दिवसांपूर्वी संतप्त आंदोलकांनी सिंध प्रांतातील गृहमंत्र्यांच्या घराला आग लावली होती यावेळी झालेल्या गोळीबारात तीन नागरिकांचा मृत्यू झाला होता. हे आंदोलन वाढतच चालले आहे. पाकिस्तान लष्कर आणि सरकारमध्ये पंजाबचे वर्चस्व असून त्यांचे सिंधच्या विकासाकडे वर्षानुवर्ष दुर्लक्ष होत असल्याची तेथील नागरिकांची तक्रार आहे. पाकिस्तान सरकार सिंध प्रांतावर कायम अन्याय करीत असल्याची भावना तेथील नागरिकांची झाली आहे. या अन्यायाविरोधात सिंध प्रांतातील नागरिक आवाज उठवत आहेत. इतकेच नाही तर या आंदोलनात सिंध प्रांतातील नागरिकांनी स्वतंत्र सिंधू देशाची मागणी केली आहे. ही मागणी आताच नव्हे तर मागील काही वर्षांपासून करण्यात येत आहे. पाकिस्तानातील सिंध प्रांतात हिंदू धर्मीय नागरिक मोठया प्रमाणात राहतात. या नागरिकांवर गेल्या काही वर्षांपासून अन्यायाची मालिका सुरू असून ही अन्यायाची मालिका संपावी आणि सिंध प्रांतातील हिंदू नागरिकांना त्यांचे अधिकार आणि हक्क प्राप्त व्हावेत यासाठी जगभरातून या आंदोलनाला पाठिंबा मिळत आहे. मागील काही काळात पाकिस्तानातील हिंदू महिलांवर विशेषतः सिंधी हिंदू महिलांवरील अत्याचाराच्या घटनांत कमालीची वाढ झाली आहे. या भागातील मुलींचे, महिलांचे फसवून, पळवून, सक्तीने धर्मांतर केले जात आहे. वाढत्या अत्याचारामुळे येथील नागरिक कमालीचे त्रस्त झाले आहेत. वारंवार सरकारला विनंती करूनही सरकार त्याकडे दुर्लक्ष करत असल्याने तेथील नागरिक अस्वस्थ होते त्यातच या नव्या प्रकल्पाची भर पडल्याने तेथील नागरिकांची अस्वस्थता आणखी वाढली. आपल्यावर होणारा अन्याय दूर करायचा असेल तर स्वतंत्र सिंधू देशाशिवाय पर्याय नाही अशीच भावना तेथील नागरिकांची झाली आहे त्यातूनच स्वतंत्र सिंधू देशाची मागणी करण्यात आली. मागील वर्षीच स्वतंत्र सिंधू देशाला भारत आणि अमेरिकेने पाठिंबा द्यावा अशी विनंती करण्यात आली होती. त्यावर दोन्ही देशांनी कोणतीही प्रतिक्रिया दिली नसली तरी भविष्यात या दोन्ही देशांना आंदोलनकर्त्यांच्या या मागणीची दखल घ्यावीच लागेल आणि जेंव्हा हे दोन्ही देश या मागणीची दखल घेतील तेंव्हा पाकिस्तानची आणखी शकले झालेली असतील. भारताचे शकले करण्याची स्वप्ने पाहणाऱ्या पाकिस्तानचेच शकले होण्याची वेळ आली आहे. काश्मीरला स्वतंत्र करून भारताची शकले करण्याची स्वप्ने पाहणाऱ्या पाकिस्तानला बलुच आणि सिंध प्रांतातच स्वातंत्र्याची आंदोलने होऊ लागल्याने पाकिस्तानचीच शकले होण्याची शक्यता निर्माण झाली आहे. भविष्यात पाकिस्तानातून बलुचिस्तान आणि सिंध हे दोन नवीन देश निर्माण झाले तर आश्चर्य वाटायला नको.

**श्याम ठाणेदार, दौंड जिल्हा पुणे, ९९२२५४६२९५**

पान १ वरुन

### पर्यावरणातील बदलांमुळे ...

म्हणाले की वातावरणातील बदलांमुळे शेतकऱ्यांची मोठ्या प्रमाणावर हानी होत आहे.

यावेळी राष्ट्रीय सेवा योजनेचे विभागीय समन्वय प्रा. डॉ. राजेंद्र सोनवणे कार्यक्रमाधिकारी प्रा. डॉ. राजेश सरकटे ,प्रा.योगेश लहामाटे, प्रा. किशोर तापडिया, प्रा प्रकाश पवार, डॉ बाबू तोटरे, प्रा. सतीश लोंढे प्रा.सुजाता रगडे, प्रा धनश्री देशपांडे, प्रा .मनीषा सुतार आदी उपस्थित होते.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन नागेश पवार यांनी केले तर पाहुण्यांचा परिचय गजानन माटे यांनी केला ,तर उपस्थित त्यांचे आभार प्रितेश चव्हाण मानलेत.

# ईपीएस- ९५ पेन्शनचा मुद्दा हाताळण्यास सरकार असमर्थ असेल; तर सरकारने स्वेच्छा मरणाची परवानगी द्यावी

वाढती महागाई,वाढता भ्रष्टाचार,वाढता औषधोपचार आणि वाढत्या प्रदूषणामुळे ढासळते आरोग्य यांनी ईपीएस-९५ पेंशन धारक अत्यंत त्रासलेला आहे.कारण अल्पशा पेंशनमध्ये पेन्शन धारक कोणतेही काम पूर्ण करूच शकत नाही.यावर सरकारने कानांवर हात ठेवले आहे व तोंडावर बोट ठेवले आहे यावरून स्पष्ट होते की, सरकारला ईपीएस ९५ पेंशन धारकांशी काहीही देणेघेणे नाही.त्यामुळे सरकारला विनंती आहे की,आपण जर या गंभीर समस्येवर तोडगा काढूच शकत नसेल तर स्वेच्छा मरणाची परवानगी दिली पाहिजे.याचे स्वागत आम्ही करू. गेल्या १२ वर्षांपासून ईपीएस पेंशन धारक मिनिमम (कमीत कमी) पेंशनची मागणी करीत आहे.या उद्देशाने कमीत कमी जगण्याइतकी तरी पेन्शन जाहीर करावी अशी पेंशनधारकांची केंद्र सरकारकडे अनेक वर्षांपासून मागणी करीत आहे.यावर लोकसभेत व राज्यसभेत अनेक खासदारांनी प्रश्न सुध्दा उपस्थित केले.सोबतच देशातील अनेक संघटनांनी मंत्री , खासदार,आमदार यांना निवेदनाच्या माध्यमातून सरकारपर्यत आपले प्रश्न मांडण्याचे काम केले.त्यामुळे या अर्थसंकल्पीय अधिवेशनात सरकारच्या माध्यमातून ईपीएस-९५ बद्दल ठोस निर्णय घेऊन पेंशन धारकांना दिलासा देईल अशी आशा देशातील दिड करोड वृध्द पेंशन धारकांना वाटत होती.परंतु याही अर्थसंकल्पीय अधिवेशनात ईपीएस-९५ पेंशन धारकांच्या पदरी निराशाच आली ही अत्यंत दुःखद आणि चिंताजनक बाब आहे.अनेक वर्षांपासून पेंशन धारकांचा संघर्ष सुरूच आहे.लोकसभा निवडणुकीच्या आधी ईपीएस पेंशन धारकांबद्दल सरकारकडुन चांगली बातमी येण्याचे संकेत होते.परंतु सरकारने पेंशन धारकांच्या पदरी फक्त निराशा दिली.याचे दुःख करोडो वयोवृद्ध पेंशन धारकांना झाले.तरीही जगण्याइतकी पेंशन दिली पाहिजे याबद्दल अजून पर्यंत सरकारला जाग आलेला नाही. ईपीएस-९५ पेंशनचा मुद्दा कोणत्याही एका पक्षाचा,संघटनेचा किंवा संस्थेचा नसुन सार्वजनिक आहे.केंद्र सरकार मोठमोठ्या गोष्टी करत आहेत परंतु वृध्दांकडे पुर्णतः दुर्लक्ष करीत आहे. ईपीएस-९५ पेंशन धारकांना न्याय मिळेल या आशेने आतापर्यंत उम्मीद टीकुन होती.परंतु सरकार मिनिमम पेंशन बद्दल एकही शब्द बोलायला तयार नाही ही अत्यंत गंभीर बाब आहे. ईपीएस-९५ पेन्शन बद्दल सरकार सोबत,मंत्र्यांसोबत व अनेक खासदारांसोबत चर्चा होवून सुध्दा सरकार पेन्शन धारकांवर अन्याय करतांना दिसते याचे जिवंत उदाहरण या अर्थसंकल्पीय अधिवेशनात दिसून आले.आज देशातील दिड करोड ईपीएस-९५ पेन्शन धारकांना कमीत कमी १००० व जास्तीत जास्त ३००० रूपयापर्यंत पेन्शन मिळत असल्यामुळे त्यांचा उदरनिर्वाह होणे अत्यंत कठीण झाले आहे.कारण सरकारने महागाईचा मोठा डोंगर उभा केला आहे यात सर्वसामान्य व पेंशन धारक दबलेला आहे.यामुळे अल्पशा पेन्शनमध्ये पेन्शन धारक जगुही शकत नाही आणि मरूही शकत नाही.कारण खाण्यापिण्याचा खर्च, इलेक्ट्रीक बिल, पाण्याचे बिल,घरटॅक्स,वाढती महागाई, वयानुसार औषधोपचार इत्यादी अती आवश्यक सेवा १००० किंवा ३००० रूपयात कशाकाय पुर्ण होणार? हे गांभीर्य सरकारला का दिसत नाही? सरकार एवढी निर्लज्ज का झाली?पेंशन धारकांची मागणी होती की, कमीत कमी ७ हजार ५०० रुपये पेन्शन, महागाई भत्ता व वैद्यकीय सुविधा मिळावी. परंतु वित्त मंत्री निर्मला सिताराम यांनी संपूर्ण ईपीएस-९५ पेंशन धारकांना निराश केल्याचे स्पष्ट दिसून येते.ईपीएस पेन्शन धारकांचा मुद्दा अत्यंत गंभीर, महत्त्वाचा आणि ज्वलंत असल्याचे मी समजतो. हा ज्वलंत मुद्दा असल्याने याची दखल केंद्र सरकारने या अर्थसंकल्पीय अधिवेशनात घेणे गरजेचे होते. परंतु सरकारने याला यत्किंचितही महत्व दिले नाही ही अत्यंत दुःखद बाब आहे. वृद्धांच्या अडीअडचणी पाहून ईपीएस- १९९५ पेन्शन धारकांचा प्रश्न मार्गी लावायला पाहिजे होता परंतु सरकारने पेंशन धारकांना निराश केले.केंद्र सरकारने आतापर्यंत दिड करोड ईपीएस पेन्शन धारकांच्या तोंडाला पाने पुसण्याचे काम केले. तरीही ६० ते ८०वर्षाच्या म्हाताऱ्या पेन्शन धारकांनी आतापर्यंत शांततेने आंदोलन केले आणि करीत आहे व जगण्याइतकी पेंशनच्या मागणीची आस लावून बसले होते. कारण पेन्शन ही त्यांच्या ''म्हारपणाची शीदोरी'' आहे. त्यामुळे पेन्शन हे ''जीवन-मरणाचे'' साधन सुध्दा आहे.याबाबदची सुध्दा सरकारने जान ठेवली नाही. सरकारने पेन्शन धारकांचा अंत न पाहता कोणत्याही योजनेअंतर्गत कमीत कमी ७५०० रुपये पेन्शन, महागाई भत्ता आणि वैद्यकीय सुविधा ताबडतोब लागु करण्याचा निर्णय आतातरी घ्यावा. आता पेन्शन धारकांच्या प्रश्नावर अंतिम निर्णय घेण्याची वेळ आली आहे.देशात अनेक कठीण प्रश्न आहेत यात दुमत नाही आणि सरकार यावर नेहमी तोडगा काढण्याचा प्रयत्न करीत असते. परंतु आज १४० कोटी जनता व राजकीय पुढारी उघडल्या डोळ्यांनी दिड कोटी पेन्शन धारकांच्या वेदना पाहात आहे व दिसत आहे.परंतु सरकार ईपीएस-१९९५ च्या पेन्शन धारकांच्या बाबतीत चेहऱ्यावर पांघरूण घेऊन बसले आहे. सरकारच्या तिजोरीत कामगारांच्या घामाचा ''अरबो रूपया'' सरकारजवळ आहे हा पैसा सरकार ''लोकप्रतिनिधीच्या'' पगारासाठी, पेन्शनसाठी व इतरत्र वापरत असतो. परंतु सरकार कामगारांना पेन्शन देवतांना ''भिक'' दील्यासारखी पेंशन देत आहे. पेंशन धारकांच्या या घटनेवरून असे दिसुन येते की सरकारने पेन्शन धारकांना वाऱ्यावर सोडले की काय असे वाटत आहे. ईपीएस-९५ पेन्शन धारक प्रत्येक अधिवेशनात पेन्शन वाढण्याची वाट पाहत असतो. परंतु नेहमी त्यांच्या नशिबी नीराशा लागते. ईपीएस पेन्शन धारकांनी गल्लीपासून तर दिल्लीपर्यंत अनेक आंदोलने करून रस्त्यावर उतरले. तरीही सरकारचे डोळे उघडले नाही. म्हणजेच केंद्र सरकार ईपीएस-१९९५ पेन्शन धारकांबद्दल उदासीन असल्याचे दिसून येते. अर्थसंकल्पीय अधिवेशनात अर्थमंत्री निर्मला सीतारामन ईपीएस-१९९५ च्या पेन्शन धारकांच्या जखमेवर फुंकर घालेल असे वाटत होते.परंतु सरकारने पेन्शन धारकांना वाऱ्यावर सोडले व निराशा हाती आली. ईपीएफओ चा पैसा हा राज्य सरकारच्या माध्यमातून केंद्रात जात असतो. त्यामुळे ईपीएस-१९९५ च्या पेन्शन धारकांना न्याय देण्याचे काम व दायीत्व केंद्र सरकारचे असते तेवढेच राज्य सरकारचे सुध्दा असते. कारण देशाच्या विकासाकरिता संपूर्ण पैसा हा राज्य सरकारच्या तिजोरीतुन केंद्रात जात असतो.त्यामुळे कामगार व कर्मचाऱ्यांचा ईपीएफओने घेतलेला पैसा गेला कुठे? असाही प्रश्न दिड करोड पेन्शन धारकांपुढे उपस्थित आहे.त्यामुळे प्रत्येक राज्यातील कामगार व कर्मचारी विचारत आहे की पेन्शन करीता कापलेला पैसा गेला कुठे? ईपीएस १९९५ चे पेन्शन धारक आपल्या हक्काचा पैसा पेन्शनच्या स्वरूपात सरकारला मागत आहे.परंतु सरकार यावर मात्र मौन धारण केल्याचे दिसून येते. म्हणजेच आज पेन्शन धारकांची परीस्थिती अशी झाली आहे की ''आपलाच पैसा आपणच चोर''. त्यामुळे ईपीएस १९९५ च्या पेन्शन धारकांसमोर प्रश्न आहे की ''जगावे की मरावे''अशी गंभीर परिस्थिती आज ईपीएस पेन्शन धारकांची झाली आहे. त्यामुळे सरकारने ईपीएस पेन्शन धारकांना कमीत कमी ७५०० रूपये पेन्शन, महागाई भत्ता व इतर सुविधा लागू करून पेन्शन धारकांना योग्य न्याय सरकारने द्यावा. पेंशनधारक आशावादी आहेत. त्यामुळे पेन्शन धारकांना विश्वास आहे की ईपीएस १९९५ पेन्शन धारकांचा प्रश्न अवश्य सुटेल.पेंशन धारकांची ही लढाई अंतिम आहे. ईपीएस पेन्शन धारक चिंतेने मरत आहे, महागाई वाढत आहे, आर्थिक परिस्थिती नाजूक होत आहे.सुप्रिम कोर्टाचेही म्हणने आहे की ईपीएस पेन्शन धारकांना मीळणारी पेन्शन ही तुटपुंजी आहे.त्यामुळे जगण्याइतकी पेन्शन मिळायलाच पाहिजे. शेतकरी हा ज्याप्रमाने देशाचा अन्नदाता आहे त्याचप्रमाणे देशाचा कामगार हा ''शिल्पकार'' आहे याची जाण केंद्र सरकारने ठेवली पाहिजे.राजकीय पुढारी मोठ्या ऐटीने सांगतात की समान हक्क,समान न्याय, समान अधिकार मग ईपीएस पेन्शन धारकांच्या पेन्शनमध्ये व राजकीय पुढाऱ्यांच्या पेन्शन, पगार यात तफावत का? असाही प्रश्न सर्वसामान्यांसमोर उपस्थित होतो. केंद्र सरकारने ज्याप्रमाणे आठव्या वेतन आयोग स्थापनेला मंजुरी दिली. त्याचप्रमाणे ईपीएस-९५ पेंशन बद्दल सरकारने ठोस निर्णय घेतला पाहिजे. मी केंद्र सरकारला विनंती करतो की आपण अनेक योजना अंमलात आणल्यात त्याचे मनापासून स्वागत. परंतु २०१४ पासून प्रलंबित असलेला व लोकसभेत पक्ष-विपक्षाच्या अनेकदा खासदारांनी उचललेला ईपीएस-९५ चा पेंशनचा मुद्दाला गांभीर्याने घेऊन कमीत कमी ७५०० रूपये पेंशन जाहीर करून अवश्य मार्गी लावेल अशी आशा देशाच्या दिड करोड पेंशन धारकांना आहे.सरकारला यावर काहीच निर्णय घ्यायचा नसेल ईपीएस पेंशन धारकांना सरकारने स्वेच्छा मरणाची परवानगी द्यावी याचेही आम्ही स्वागत करू.जय हिंद!जय भारत.

**रमेश कृष्णराव लांजेवार**
**मो.नं.९९२१६९०७७९, नागपूर.**

### वरखेडा विद्यालयात महाराष्ट्राची लोकधारा सांस्कृतिक महोत्सव उत्साहात संपन्न

# वरखेडा विद्यालयाचा सांस्कृतिक महोत्सव स्तुत्य- संचालक प्रविण (नाना) जाधव

**दिंडोरी । प्रतिनिधी -** मराठा मराठा विद्या प्रसारक विद्या प्रसारक समाज संस्था संचलित जनता विद्यालय व अभिनव बालविकास मंदिर वरखेडा विद्यालयांमध्ये सन २०२५-२६ या वर्षाचा महाराष्ट्राची लोकधारा सांस्कृतिक महोत्सव मोठ्या उत्साहात पार पडला.* कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे दिंडोरी तालुक्याचे सहकार नेते सुरेश डोखळे यांनी,आपल्या भाषणामध्ये सांगितले की,वरखेडा विद्यालयाचा हा सांस्कृतिक महोत्सव विद्यार्थ्यांच्या कलागुणांसाठी प्रेरणादायी असून त्याचा विकास हाच खरा शाळेचा विकास आहे.

सांस्कृतिक महोत्सवाच्या कार्यक्रमाचे अध्यक्ष म.वि.प्र.समाज संस्थेचे दिंडोरी तालुक्याचे संचालक प्रवीण जाधव यांनी वरखेडा विद्यालय नेहमीच विविध उपक्रम घेवून विद्यार्थी कलागुणांना वाव देते.विद्यालयाने अनेक प्रकारचे नावीन्यपूर्ण उपक्रम घेऊन सामाजिक शैक्षणिक बरोबर सांस्कृतिक ठेवा ही जपला आहे. असे सांगितले.

वणी पोलीस ठाण्याच्या सहाय्यक पोलीस निरीक्षक () गायत्री जाधव यांनी,''सर्व विद्यार्थ्यांना सुरक्षिततेचा सल्ला दिला.या सांस्कृतिक कार्यक्रमामध्ये कोणताही अनुचित प्रकार घडणार नाही याची सर्वांनी काळजी घेतली पाहिजे असे सांगितले.

सांस्कृतिक महोत्सवाचे पूजन म.वि.प्र. शिक्षणाधिकारी डॉ.कैलास शिंदे,वणी पोलीस ठाण्याच्या सहाय्यक पोलीस निरीक्षक गायत्री जाधव,शालेय समिती अध्यक्ष प्रकाश भुसाळ, अभिनव बालविकास मंदीरचे अध्यक्ष प्रभाकर दादा उफाडे, पर्यवेक्षक बी.जे.पातळे स,वरखेडा विविध कार्यकारी सोसायटीचे चेअरमन मनोज पडोळ, कादवा कारखान्याचे संचालक बापूराव पडोळ, अवनखेडचे सरपंच नरेंद्र जाधव,कृष्णा मातेरे, दत्तात्रय उफाडे, वरखेडा गावचे लोकनियुक्त सरपंच केशव वाघले वरखेडा गावचे उपसरपंच राजेंद्र उफाडे,वरखेडा गावचे पोलीस पाटील कैलास बलसाने, सुभाष वडजे, विजय देशमुख, लक्ष्मण भुसाळ, जगजीवन उफाडे, काशिनाथ उफाडे, राजेंद्र नाना उफाडे, संजीव पठाडे, गणपत भुसाळ, विजय देशमुख, जयराम उफाडे, अशोक वडजे, नाशिक मराठा हायस्कूलचे मुख्याध्यापक पुरुषोत्तम थोरात,मविप्र सोसायटीचे चेअरमन सुनील काळे,संचालक कृष्णराव बाबा मोरे सेवानिवृत्त मुख्याध्यापक बाळासाहेब पाटील,जगन्नाथ दिघे,माजी मुख्याध्यापक रायते,त्रंबक उफाडे,जयराम उफाडे,पंकज अस्वले,साहेबराव घोलप,निलेश सवंद्रे,भूषण देवरे,संदीप नागपूरे,परशराम उफाडे,दिलीप माऊली उफाडे, जालिंदर उफाडे, आदिनाथ पडोळ, प्रमोद भुसाळ, जगदीश वडजे, आदी सदस्य माता पालक यांनी पुष्पहार अर्पण केला. कार्यक्रमाच्या प्रमुख पाहुण्यांचे स्वागत प्रवेशद्वारा पासून विद्यालयातील लेझीम पथकाने केले. सांस्कृतिक महोत्सवासाठी परिश्रम घेणारे नृत्यदिग्दर्शक (कोरिओग्राफर) शैलेश कटारे, साक्षी पगारे, चेतन बोराळे, विकी लहाने आदींचा पाहुण्यांच्या हस्ते मानचिन्ह देऊन सत्कार करण्यात आला. अभिनव बालविकास मंदिर मधील चिमुकल्यांनी नृत्यातून कार्यक्रमाची शोभा वाढवली त्यामध्ये नर्सरीच्या चिमुकल्यांनी गणपती वंदनाने सुरुवात करून ज्युनिअर केजी, प्राथमिकच्या विद्यार्थ्यांनी काली महाकाली,छोटा बच्चा जानकर हमे, लल्लाटी भंडार, बम बम भोले, खान्देशी, गौळण, नवरी नटली, आले मराठे, आदिवासी पावरी आदी...! या गाण्यावर तसेच काही विद्यार्थ्यांनी गणपती आरती,अष्टमी, फिरी फिरी नाच,ही नवरी असली, आदी गाण्यांवर नृत्य करून सर्वांची मने जिंकली. त्याचप्रमाणे माध्यमिक विद्यालयातील गणपती आरती, खंडोबा, तात्या विंचू, देशभक्ती पर गीत, सख्खी बायको गेली, स्त्री भ्रूण हत्या,शिव पार्वती आदी... प्रकारचे एकूण ११ नृत्य सादर करून कार्यक्रमाची शोभा वाढवली. या महोत्सवात ''शिव पार्वती विवाह,तसेच नंदीवर बसलेले देवांचे देव महादेव यांची सुंदर वेशभूषेत गाण्यावर बघावयास मिळून ते कार्यक्रमाचे आकर्षण ठरले. सांस्कृतीक महोत्सवानिमित्त वरखेडा गावातील ईश्वरी डेअरी फार्मचे संचालक जालिंदर उफाडे यांनी विद्यालयातील सर्व ७५० विद्यार्थ्यां बरोबर सर्व शिक्षकांना जेवणाची उत्तम व्यवस्था करून ''अन्न हे पूर्ण ब्रह्म.... ची प्रचिती आणून दिली.मागील वर्षी सुद्धा त्यांनी जेवण देऊन दानशूरत्व दाखवले होते.याबद्दल वरखेडा गाव परिसरातून उफाडे परिवाराच्या दानत्वाचे कौतुक होतं आहे.



सांस्कृतिक महोत्सव कार्यक्रम तिसऱ्यांदा दिवसरात्र असल्याने लाईटच्या जगमग प्रकाशात आणि थिरकणाऱ्या पावलांना बघण्यास वरखेडा आंबेवणी, राजापूर ोडेवाडी, करंजी, कोंबडवाडी, परमोरी, ओझरखेड आदी परिसरातून हजारो माता पालक वर्ग मोठ्या संख्येने उपस्थित होता. कार्यक्रम यशस्वीतेसाठी विद्यालयाचे पर्यवेक्षक बी.जे.पातळे,वरिष्ठ लिपिक कैलास उगले सांस्कृतिक कमिटी सर्व शिक्षक शिक्षकेत्तर कर्मचारी यांनी परिश्रम घेतले.

सांस्कृतिक कार्यक्रमाचे सूत्रसंचालन उपशिक्षिका नलिनी बुवा, अलका शिंदे, वृषाली रौंदळ यांनी संयुक्त पणे केले तर आभार उपशिक्षिका मनिषा उफाडे यांनी मानले. कार्यक्रम मोठ्या उत्साहात पार पडला.

# डॉ ज्ञानेश्वर सदार पाटील यांनी. किसनराव सदार विद्यालयात कर्करोग जागरूकता दिन निमित्त मार्गदर्शन

**रिसोड -** किसनराव सदर विद्यालयामध्ये आज दिनांक ४ फेब्रुवारी म्हणजेच जागतिक कर्क रोग जागरूकता दिन साजरा करण्यात आला कार्यक्रमाचे अध्यक्ष सतीश वायाळ सर (क्रीडा शिक्षक) हे होते प्रमुख मार्गदर्शक डॉक्टर ज्ञानेश्वर पाटील सदार( योग गुरु) हे होते. प्रमुख उपस्थिती मध्ये माधवराव जाधव सर (मुख्याध्यापक), प्रमोद बकाल सर, प्रदीप वाठोरे सर, श्रीराम फुपाटे सर ,खडसे सर ,मंगेश कोरडे ,माधव मार्कड इत्यादी उपस्थित होते. सर्वप्रथम मान्यवरांच्या हस्ते छत्रपती शिवाजी महाराज यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. त्यानंतर आलेल्या सर्व मान्यवरांचे पुष्पगुच्छ देऊन स्वागत करण्यात आले त्यानंतर काही विद्यार्थ्यांनी कर्करोग याविषयी आपले मत व्यक्त केले कार्यक्रमाचे प्रमुख मार्गदर्शक डॉक्टर ज्ञानेश्वर सदार पाटील यांनी विद्यार्थ्यांन यांनी विद्यार्थ्यांना सांगितले की. जगामध्ये भयंकर प्रमाणात व्यसन वाढले ,तंबाखू गुटखा मद्यपान , सिगरेट, फास्ट फूड खाणे, इत्यादी वाईट सवयीमुळे आज कॅन्सर हा जागतिक रोग झालेला आहे , भारतामध्येही हा कॅन्सर झपाट्याने फैलत आहे ह्याला आपल्या वाईट सवयी म्हणजेच रात्री जागरण करणे, मोबाईलवर जास्त वेळ देणे, व्यायाम न करणे इत्यादी वाईट सवयी यामुळे कर्करोग होऊ शकतो ते टाळण्यासाठी आपण रोज पौष्टिक अन्न खाणे, वेळेवर झोपणे, सकाळी उठून व्यायाम व योगासने करणे, इत्यादी सवयीमुळे आपण कर्करोगाला दूर ठेवू शकतो, असे विद्यार्थ्यांना समजून सांगितले.



डॉ ज्ञानेश्वर सदार पाटील यांनी कॅन्सर दिनानिमित्त ज्येष्ठांना संदेश दिला

ज्येष्ठ नागरिकांनो, कॅन्सर दिन हा आपल्याला आरोग्याबद्दल जागरूक होण्यासाठी आणि एकमेकांना प्रेरणा देण्यासाठी साजरा केला जातो. वाढत्या वयानुसार आरोग्याची अधिक काळजी घेणे आवश्यक असते. योग्य आहार, नियमित व्यायाम, वेळेवर तपासणी आणि सकारात्मक विचार या गोष्टी कॅन्सरपासून बचाव करण्यासाठी महत्त्वाच्या आहेत. आपण आपल्या अनुभवाने कुटुंब आणि समाजाला योग्य मार्गदर्शन करू शकता. तंबाखू, गुटखा, सिगारेट यांसारख्या घातक सवयींपासून दूर राहणे आणि इतरांनाही त्यापासून दूर ठेवणे ही मोठी सामाजिक जबाबदारी आहे. दरवर्षी आरोग्य तपासणी करून घ्या, शरीरात काही बदल जाणवले तर त्वरित डॉक्टरांचा सल्ला घ्या. लवकर निदान झाले तर कॅन्सरवर उपचार शक्य होतात. चला, या कॅन्सर दिनानिमित्त आपण सर्वजण एकमेकांना निरोगी जीवनाचा संदेश देऊया. ‘‘नियमित तपासणी, संतुलित आहार आणि सकारात्मक विचार हेच कॅन्सरविरुद्धचे प्रभावी शस्त्र आहे.’’ आपले आरोग्य हेच आपल्या कुटुंबाचे खरे धन आहे. असे मार्गदर्शन डॉ ज्ञानेश्वर सदार पाटील यांनी केले कार्यक्रमाचे अध्यक्ष वायाळ सर यांनी विद्यार्थ्यांना कर्क रोगा विषयी जागरूक कशी राहावे , रोज मैदानी खेळ खेळल्याने कर्करोग आपल्यापासून दूर राहू शकतो या विषयी विद्यार्थ्यांना समजून सांगितले. अशा प्रकारे आमच्या विद्यालयामध्ये कर्करोग जागरूकता दिन साजरा करण्यात आला कार्यक्रमाचे सूत्रसंचालन वाठोरे सर (विज्ञान शिक्षक) यांनी केले तर आभार प्रदर्शन फुपाटे यांनी केले.

# बीएलओच्या कामातून शिक्षकांना कायमस्वरूपी कार्यमुक्त करा; शेख अब्दुल रहीमची थेट मुंबई येथे मागणी

**छत्रपती संभाजीनगर । प्रतिनिधी** - निवडणूक प्रक्रियेसाठी नेमण्यात येणाऱ्या बीएलओ कामातून शिक्षकांना कायमस्वरूपी कार्यमुक्त करण्यात यावे, अशी ठाम मागणी शिक्षक तथा हॅप्पी टू हेल्प फौंडेशनचे संस्थापक अध्यक्ष तसेच महाराष्ट्र राज्य जुनी पेन्शन हक्क संघटनचे राज्य प्रवक्ता शेख अब्दुल रहीम यांनी केली आहे. याबाबत त्यांनी संबंधित प्रशासनाला निवेदन सादर करून सांगितले की, शिक्षक हे मुख्यत्वे शैक्षणिक कार्यासाठी नियुक्त असतात. बीएलओ सारख्या सतत चालणाऱ्या निवडणूक संबंधित कामांमुळे अध्यापन कार्यावर मोठ्या प्रमाणात परिणाम होत आहे. शाळांमधील विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होत असून शिक्षकांवर मानसिक व शारीरिक ताणही वाढत आहे.

शेख अब्दुल रहीम हे मागील अनेक वर्षांपासून सामाजिक, शैक्षणिक व मानवतावादी उपक्रमांद्वारे कार्यरत असून हॅप्पी टू हेल्प फौंडेशन या संस्थेमार्फत त्यांनी गरजू विद्यार्थी, शिक्षक आणि सर्वसामान्य नागरिकांसाठी विविध उपक्रम राबवले आहेत. शिक्षकांच्या समस्या आणि अडचणी याबाबत ते सातत्याने प्रशासनाकडे आवाज उठवत आहेत.

या निवेदनामध्ये असेही नमूद करण्यात आले आहे की, बीएलओ चे काम हे पूर्णवेळ प्रशासकीय स्वरूपाचे असल्याने त्यासाठी स्वतंत्र कर्मचारी वर्ग नेमण्यात यावा. शिक्षकांना त्यांच्या मूळ शैक्षणिक जबाबदाऱ्यांपासून दूर ठेवणे हे शिक्षण व्यवस्थेसाठी घातक आहे. शासनाने या मागणीची गांभीर्याने दखल घेऊन शिक्षकांना बीएलओ च्या कामातून कायमस्वरूपी कार्यमुक्त करावे, अशी अपेक्षा यावेळी शेख अब्दुल रहीम यांनी व्यक्त केली. मंत्रालय, मुंबई येथे राज्य शासनाचे उपसचिव तथा सह- मुख्य निवडणूक अधिकारी महाराष्ट्र राज्य श्री. मनोहर पारकर सर यांची प्रत्यक्ष भेट घेऊन सविस्तर चर्चा करून निवेदन सादर केले.



दंत व नेत्र चिकित्सा सह नॅचरोपॅथीला उत्स्फूर्त प्रतिसाद

# मोफत सर्व रोग निदान शिबिर संपन्न



**छत्रपती संभाजी नगर । प्रतिनिधी -** फुले शाहू आंबेडकराईट स्टडी फाउंडेशन व दि ऑल इंडिया नाग असोसिएशन (आईना) समाज जीवनात सातत्याने प्रबोधनाचे कार्य करीत आहे. त्या अनुषंगाने अनेक प्रतिनिधींनी आरोग्य शिबिर लावावे, अशी मागणी केली होती. याची जाणीव ठेवून मूकनायकच्या १०५ व्या वर्धापन दिनानिमित्त १ फेब्रुवारी २०२६ ला संस्थेचे जनसंपर्क कार्यालय, ४, साकेत नगर भावसिंगपुरा रोड, छत्रपती संभाजी नगर, महाराष्ट्र येथे मोफत सर्व रोग निदान शिबिराचे आयोजन करण्यात होते.

या मोफत आरोग्य शिबिरासह अर्थात आईना बंधुता केंद्र व संस्थेच्या विभागीय कार्यालयाचे उद्घाटन दि ऑल इंडिया नाग असोसिएशनचे चेअरमन अस्थिरोग तज्ञ व प्लास्टिक सर्जन डॉ. राजीव कुमार यांच्या हस्ते करण्यात आले. याप्रसंगी शिबिराच्या अनुषंगाने डॉ. आंबेडकर मिशन दवाखान्याचे विभाग प्रमुख डॉ. प्रमोद दुथडे, डॉ. कल्पना गंगावणे, डॉ. कामराज गणेशण, संचालक बी. बी. मेश्राम यांनी आपले मार्गदर्शनपर मनोगत व्यक्त केले. बी . बी. मेश्राम म्हणाले की, डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी महाड सत्याग्रहात . अर्थात एखाद्या रोगाचे रोगनिदान नीट झाले नाही तर त्यावर केले जाणारे औषधोपचार निष्फळ ठरतात, असे म्हटले होते. हे लक्षात घेऊन आरोग्य शिबिराचे आयोजन करण्यात आल्याचे स्पष्ट केले.

या शिबिराला नागपूर वरून एन सी सी डी चे सेवानिवृत्त संयुक्त संचालक डॉ. एल. जे. कान्हेकर, तामिळनाडू वरून मॅक्सिओफेसीकल सर्जन डॉ. कामराज गणेशण, बिहार वरून नॅचरोपॅथी विशेषज्ञ डॉ. रघुवीर प्रजापती, अस्थिरोग तज्ञ डॉ. राजीवकुमार, डॉ. आंबेडकर मिशन दवाखान्याचे विभाग प्रमुख, हृदयरोग व मधुमेह तज्ञ डॉ. प्रमोद दुथडे, दृष्टीमित तज्ञ डॉ. जोगेंद्र पाचगावकर, दंत चिकित्सक डॉ. तृप्ती मेश्राम, डॉ. सुरजीत रहाटे, डॉ. आनंद तारू, डॉ. कल्पना गंगावणे, डॉ. जोगेंद्र पांचगावकर, डॉ. ऐश्वर्या नांदुर्गेकर, डॉ. शीतल तिगोटे, डॉ. नीती म्हस्के यांच्या मार्गदर्शनाखाली रुग्णांची मोफत तपासणी करण्यात आली. यावेळी स्टाफ सिस्टर संजना प्रधान आणि प्रतीक्षा उपस्थित होत्या. जवळपास १८० रुग्णांची तपासणी करण्यात आली. दंत व नेत्र चिकित्सा आणि नॅचरोपॅथीला उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. सुरुवातीला संस्थेच्या वतीने मान्यवरांच्या हस्ते आदर्शांना पुष्पमाला अर्पण करण्यात आल्या तसेच सर्व डॉक्टरांचे पुष्पगुच्छ व शाल देऊन स्वागत करण्यात आले तर शेवटी व्हिजन आय केअर क्लिनिकचे डॉ. जोगेंद्र पाचगावकर, शिवशंकर कॉलनी यांनी सर्वांचे आभार व्यक्त केले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी अॅड. विलास रामटेके, उद्योजक शशिकांत काळे, उद्योजक मिलिंद बागुल, डॉ. जोगेंद्र पाचगावकर, प्रा. विलास कटारे, डॉ. व्ही. एच. कांबळे, महादेव डांबरे, बी. बी. मेश्राम यांनी विशेष प्रयत्न केले.




# बाल मजूरीविरोधात तातडीने धाडसत्र राबवावे - जिल्हाधिकारी मित्तल

## पोलिसांना बालस्नेही पोलिस पुरस्कार देणार; जालना जिल्हा कॉपीमुक्तीसाठी पोलिसांची भुमिका महत्वाची

**जालना । प्रतिनिधी -** बाल किशोरवयीन कामगार निर्मुलनासाठी राष्ट्रीय बाल अधिकार संरक्षण आयोगाने दि.२६ जानेवारी ते ३१ मार्च २०२६ या तीन महिन्याच्या कालावधीसाठी संपूर्ण भारतात बचाव आणि पुर्नवसन मोहीम आयोजित केली आहे. तरी जालना जिल्ह्यातील बाल आणि किशोरवयीन कामगारांची तसेच रस्त्यावरील मुलांची ओळख पटविणे, त्यांची सुटका करणे, जिल्ह्यातील हॉट स्पॉटची निवड करुन धाडसत्राचे आयोजन करण्यात येणार आहे. तरी पोलिस विभागाने जिल्ह्यातील बालकामगार मुक्त करण्यासाठी आपली यंत्रणा कार्यान्वित करावी. तसेच जालना जिल्हा बाल कामगार मुक्तीसाठी बाल मजूरीविरोधात तातडीने धाडसत्र राबवावे, असे निर्देश जिल्हाधिकारी आशिमा मित्तल यांनी बैठकीत दिले.

जिल्हाधिकारी कार्यालयातील सभागृहात दुरदृष्य प्रणालीद्वारे जालना जिल्हा कॉपीमुकत अभियान व बालकामगार शोध मोहीम विषयक बैठक पार पडली. याप्रसंगी त्या बोलत होत्या. या निवासी उपजिल्हाधिकारी शशिकांत हदगल, पोलिस उपअधिक्षक रविंद्र निकाळजे, शिक्षणाधिकारी बाळु खरात, जिल्हा बाल संरक्षण अधिकारी गजानन इंगळे, सर्व यांच्यासह संबंधित यंत्रणेचे प्रमुख अधिकारी उपस्थित होते.

जिल्हाधिकारी आशिमा मित्तल म्हणाल्या की, बालमजूरी प्रथा समुळ उच्चाटन करुन बाल मजूरांना शिक्षणाच्या मूळ प्रवाहात समाविष्ठ करणे अत्यंत गरजेचे आहे. बाल कामगार (प्रतिबंध व निर्मूलन) अधिनियम १९८६ कायद्यान्वये १४ वर्ष पुर्ण न केलेल्या बालकास धोकादायक उद्योग आणि प्रक्रियांमध्ये कामावर ठेवण्यास प्रतिबंध करण्यात आलेला आहे. बाल कामगार मुक्तीबाबत दररोज कारवाई होणे अपेक्षित असून सर्व पोलिस ठाण्याच्या प्रमुखांनी आपल्या हद्दीतील किमान ५ बाल कामगार शोधून त्यांचे पुर्नवसन करावे. धोकादायक उद्योगातील १४ वर्षाखालील बाल मजूरांच्या मुक्ततेसाठी धाडसत्रे आयोजित करावीत. धाडसत्रात मुक्त करण्यात आलेल्या बाल मजूराच्या पालकांना जर संबंधित मालकाने आगाऊ उचल कोणत्याही कारणास्तव प्रत्यक्ष वा अप्रत्यक्ष दिल्याचे तपासात आढळल्यास, अशा बाल कामगारास वेठबिगार कामगार म्हणून समजण्यात यावे आणि त्यानूसार मालकाविरुध्द कारवाई करावी आणि अशा वेठबिगार बालमजूरास नियमानुसार शासकीय फायदे मिळवून देण्यात यावेत. बालमजूर नियुक्त केलेल्या मालकाविरुध्द फौजदारी गुन्हा दाखल करुन अशा मालकांकडून प्रति बाल मजूर २० हजार रुपये जिल्हा बाल कल्याण निधीत जमा करुन त्यात शासनाचा हिस्सा ५ हजार रुपये प्रति बाल मजूर जमा करावा. या जमा निधीचा विनीयोग शक्यतो त्याच बाल मजूरांच्या पुनर्वसनार्थ करण्यात यावा. दर आठवड्याला जिल्हा कृती दलाची आढावा बैठक आयोजित करण्यात यावी.



बाल मजूरी ही सामाजिक अनिष्ठ प्रथा समुळ नष्ट करण्यासाठी जनजागृती मोहीम प्रभावीपणे राबवावी. बालकामगार मुक्त करण्यासाठी योगदान देणाऱ्या, उत्कृष्ट काम करणाऱ्या पोलिसांना बालस्नेही पोलिस पुरस्कार दिला जाईल. बालकामगार कामावर ठेवल्याने बाल कामगाराचे शारिरीक व मानसिक नुकसान होते. बाल कामगारास अत्यंत वेदना होतात व शिक्षणाच्या वयात काम करावे लागल्याने त्यांचे संपूर्ण भविष्य उध्वस्त होत असते. १४ वर्षाखालील मुलांना कामावर ठेवणे हा कायदेशीर गुन्हा असून नागरिकांनी अशा घटना आढळल्यास त्वरित कामगार विभाग अथवा चाईल्ड हेल्पलाईन १०९८ क्रमांकावर संपर्क साधण्याचे आवाहनही त्यांनी यावेळी केले.

**जालना जिल्हा कॉपीमुक्तीसाठी पोलिसांची भुमिका महत्वाची**

जिल्ह्यात माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळामार्फत उच्च माध्यमिक प्रमाणपत्र परीक्षा (बारावी) दि.१० फेब्रुवारी ते दि.१८ मार्च २०२६ तर माध्यमिक शालांत प्रमाणपत्र परीक्षा (दहावी) दि.२० फेब्रुवारी ते दि.१८ मार्च २०२६ या कालावधीत आयोजित करण्यात आली आहे. जिल्ह्यात इयत्ता बारावीच्या परीक्षेसाठी ३७ हजार ३३८ विद्यार्थ्यांसाठी ७९ परीक्षा केंद्र आहेत. इयत्ता दहावीच्या परीक्षेसाठी ३२ हजार ४३३ विद्यार्थ्यांसाठी १०२ परीक्षा केंद्र आहेत. सर्व परीक्षा केंद्रावर सीसीटीव्ही कॅमेऱ्यांच्या देखरेखीखाली होणार असून जिल्ह्यातील संवेदनशील बारावीच्या ८ तर दहावीच्या ४ अशा एकुण १२ परीक्षा केंद्रावर ड्रोन कॅमेऱ्याची नजर राहणार असून चित्रीकरणही करण्यात येणार आहे. जालना जिल्ह्यातील दहावी, बारावीच्या परीक्षा भयमुक्त वातावरणात व पारदर्शक होणे गरजेचे असल्याने जालना जिल्हा कॉपी मुक्तीसाठी पोलिस विभागाची भूमिका अत्यंत महत्वाची आहे, तरी जिल्ह्यातील संवेदनशिल परीक्षा केंद्रावर चोख पोलिस बंदोबस्त ठेवून गैरप्रकाराला आळा घालावा. परीक्षा केंद्राच्या परिसरात होणारे गैरप्रकार रोखण्यासाठी अतिशय दक्षता बाळगावी. परीक्षा कालावधीत पोलिस विभागाने वेळोवेळी सहकार्य करावे, अशा सुचना जिल्हाधिकारी आशिमा मित्तल यांनी दुरदृष्य प्रणालीद्वारे घेण्यात आलेल्या बैठकीत दिल्या. या बैठकीस सर्व उपविभागीय पोलिस अधिकारी, पोलिस ठाण्याचे प्रमुख ऑनलाईन पध्दतीने उपस्थित होते.

# 'आधीच्या तक्रारीनंतर दबावात्मक गुन्हा'' पॅटर्न

## कटाचा संशय, पत्रकार संरक्षण कायद्याच्या अंमलबजावणीची मागणी

**जालना । प्रतिनिधी -** जिल्हा परिषद बांधकाम विभागातील कामकाजाबाबत माहिती घेत असतांना एका पत्रकारावर 'शासकीय कामात अडथळा' केल्याचा आरोप करत तक्रार दाखल करण्यात आल्याची घटना समोर आली आहे. मात्र या तक्रारीआधी गुत्तेदाराच्या भावाविरोधात दोन दिवस आधीच कदीम जालना पोलिस ठाण्यात स्वतंत्र तक्रार दाखल केली होती, हे उघड झाल्याने संपूर्ण प्रकरण संशयाच्या भोवऱ्यात सापडले आहे. या क्रमाक्रमावरून पत्रकारांवर दबाव टाकण्यासाठी व बातमी थांबवण्यासाठीच नंतरची तक्रार करण्यात आली असावी, असा आरोप जोर धरत आहे.

घटनाक्रम काय सांगतो? सूत्रांकडून मिळालेल्या माहितीनुसार, गुत्तेदाराच्या भावाविरोधात दोन दिवस आधी पत्रकारास शिवीगाळ, जीवे मारण्याची धमकी दिल्याप्रकरणी कदीम जालना पोलिस ठाण्यात तक्रार देण्यात आली होती. या तक्रारीवर कदीम जालना पोलीस ठाण्यात तपास करुन गुन्हा दाखल करण्यात येणार असल्याचे पोलीस निरीक्षक श्री शेवाळे यांनी तक्रारदारास सांगितले होते. या तक्रारीत पत्रकाराने जिल्हा परिषद बांधकाम विभागात जाऊन सहाय्यक लेखाधिकारी यांच्या केबिनमध्ये माहिती घेण्याचा प्रयत्न केला. याचवेळी गुत्तेदार तेथे येऊन पत्रकारास अर्वाच्य भाषेत शिवीगाळ, धमकी व धक्काबुक्की केल्याचा आरोप आहे. मात्र यानंतर उलट पत्रकारावरच 'शासकीय कामात अडथळा' केल्याची तक्रार दाखल करण्यात आली. या घटनाक्रमामुळे ''आधीच्या तक्रारीनंतर दबावात्मक गुन्हा'' असा पॅटर्न दिसून येतो.

कायदेशीर विसंगती तज्ज्ञांच्या मते, शासकीय गुत्तेदार हा लोकसेवक नसतो. कलम १८६ किंवा भारतीय न्याय संहिता २२१ हे कलम फक्त लोकसेवकाच्या अधिकृत कर्तव्यात अडथळा आणल्यास लागू होते. मात्र येथे: कथित पीडित शासकीय गुत्तेदार (खाजगी कंत्राटदार) गुत्तेदाराचा भाऊ म्हणून 'शासकीय कामात अडथळा' हे कलम लावणे कायद्याच्या चौकटीत बसत नाही.

**पत्रकारांवर दबाव आणण्याचा संशय** पत्रकार हा जनतेच्या वतीने माहिती गोळा करतो. माहिती घेणे हा त्याचा घटनात्मक अधिकार आहे. मात्र बातमी थांबवण्यासाठी गुन्हे दाखल करण्याची पद्धत वापरली जात असल्यास तो लोकशाहीच्या चौथ्या स्तंभावर थेट आघात ठरतो. पत्रकार संघटनांचे म्हणणे आहे की, ही बाब केवळ व्यक्तीगत वाद न राहता पत्रकारितेच्या स्वातंत्र्याशी निगडीत गंभीर विषय आहे. त्यामुळे जालन्यातील पत्रकारांनी वेळीच सतर्क होऊन एकसंध होण्याची गरज निर्माण झाली आहे.

**पत्रकार संरक्षण कायद्याची गरज अधोरेखित** महाराष्ट्रात पत्रकार संरक्षण कायदा अस्तित्वात असताना देखील त्याची प्रभावी अंमलबजावणी होत नसल्याची टीका होत आहे. या प्रकरणात पत्रकाराविरोधात करण्यात आलेल्या तक्रारीची शहानिशा प्रशासनाने करावी, ही तक्रार जिल्हाधिकारी, पोलीस अधिक्षक, जिल्हा परिषद यांना देण्यात आल्याने या सर्व प्रशासकीय यंत्रणांची एक प्रकारे दिशाभूल करण्याचा घाट गुत्तेदार भावाकडून होत आहे. गुत्तेदार भावाच्या तक्रारीची दखल घेण्यापुर्वी प्रशासनाने सर्व बाबींची रितसर चौकशी करावी. गुत्तेदाराविरुध्द धमकी व अडथळा निर्माण केल्याप्रकरणी तात्काळ गुन्हा दाखल करावा व स्वतंत्र चौकशी करावी अशी मागणी होत आहे.

## दरमहा रस्ते अपघातांचे विश्लेषण करून तातडीच्या उपाययोजना करा - जिल्हाधिकारी

**जालना । प्रतिनिधी -** जिल्ह्यात दरमहा होणाऱ्या रस्ते अपघातांचे सखोल विश्लेषण करून ते तातडीने कमी करण्यासाठी सर्व संबंधित यंत्रणांनी समन्वयाने प्रभावी उपाययोजना कराव्यात, असे निर्देश जिल्हाधिकारी आशिमा मित्तल यांनी दिले. जिल्हाधिकारी कार्यालयात आज जिल्हा रस्ता सुरक्षा समितीची बैठक संपन्न झाली. या बैठकीच्या अध्यक्षस्थानावरून त्या बोलत होत्या. बैठकीस उपप्रादेशिक परिवहन अधिकारी चंद्रमोहन चिंतल, कार्यकारी अभियंता (बांधकाम विभाग सा. बां. वि.क्रमांक १ ) श्रीमती स्मिता पवार, पोलीस उप अधीक्षक रविंद्र निकाळजे यांच्यासह संबंधित विभागांचे अधिकारी उपस्थित होते. जिल्ह्यातील तसेच जालना शहरातील अपघातप्रवण स्थळांची कामे तातडीने पूर्ण करण्याचे आदेश देण्यात आले. या ठिकाणी आवश्यक सूचक व चेतावणी फलक त्वरित बसविण्याच्या सूचनाही जिल्हाधिकारी यांनी दिल्या. सन २०२५ मध्ये जिल्ह्यात एकूण ७५६ रस्ते अपघात घडले असून, त्यापैकी ३१८ अपघात जीवघेणे ठरले आहेत. या अपघातांमध्ये ३५५ नागरिकांचा मृत्यू झाल्याची गंभीर बाब समोर आली आहे. अपघातांमध्ये मोठ्या प्रमाणावर दुचाकी वाहनांचा सहभाग असल्याचे निदर्शनास आले असून, दुचाकीस्वारांनी स्वतः च्या सुरक्षिततेसाठी हेल्मेटचा सक्तीने वापर करावा, असे आवाहन जिल्हाधिकारी आशिमा मित्तल यांनी केले.

## खाजगी शिकवणीतील विद्यार्थ्यांचा ताण कमी करण्यासाठी जालन्यात जिल्हास्तरीय समिती गठीत

**जालना । प्रतिनिधी -** शाळा आणि खाजगी शिकवणी वर्गांमध्ये शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांवरील वाढता मानसिक ताण-तणाव कमी करण्यासाठी जालना जिल्हा प्रशासनाने मोठे पाऊल उचलले आहे. माननीय सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशानुसार आणि महाराष्ट्र शासनाच्या मार्गदर्शक सूचनांनुसार, जिल्हाधिकारी श्रीमती आशिमा मित्तल यांच्या अध्यक्षतेखाली जिल्हास्तरीय निरीक्षण समिती गठीत करण्यात आली आहे.

सर्वोच्च न्यायालयाचे आदेश आणि शासन निर्णय श्री. सुखदेव सहा यांनी सर्वोच्च न्यायालयात दाखल केलेल्या अपिल याचिकेवर २५ जुलै २०२५ रोजी सुनावणी झाली होती. यावेळी न्यायालयाने विद्यार्थ्यांवरील शैक्षणिक ताण कमी करण्यासाठी विस्तृत सूचना दिल्या होत्या. या पार्श्वभूमीवर, महाराष्ट्र शासनाच्या शालेय शिक्षण व क्रीडा विभागाने ७ जानेवारी २०२६ रोजी शासन निर्णय () निर्गमित करून मार्गदर्शक तत्वे जाहीर केली आहेत.

समितीची रचना आणि सदस्य जालना जिल्ह्यासाठी स्थापन करण्यात आलेल्या या समितीत विविध क्षेत्रांतील तज्ज्ञांचा समावेश आहे: अध्यक्षः श्रीमती आशिमा मित्तल (जिल्हाधिकारी, जालना) सदस्यः डॉ. सुजाता देवरे/अग्निहोत्री (सहसंचालक, उच्च व तंत्रशिक्षण विभाग) सदस्यः श्री. बाळु रुस्तुम खरात (शिक्षणाधिकारी, माध्यमिक) सदस्यः डॉ. राजेंद्र पाटील (जिल्हा शल्य चिकित्सक) सदस्यः श्रीमती कोमल कोरे (जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी) नामनिर्देशित सदस्यः डॉ. गजानन खरात (बाल मानसशास्त्रज्ञ, जिल्हा रुग्णालय) समितीची कार्यकक्षा ही समिती जिल्ह्यातील शाळा आणि विशेषतः खाजगी शिकवणी वर्गांवर लक्ष ठेवणार आहे. विद्यार्थ्यांकडून प्राप्त होणाऱ्या तक्रारींचे निवारण करणे आणि त्यांना तणावमुक्त वातावरणात शिक्षण मिळेल याची खात्री करणे, हे या समितीचे मुख्य उद्दिष्ट आहे.

या निर्णयाची अंमलबजावणी तातडीने सुरू झाली असून, माध्यमिक शिक्षणाधिकारी श्री. बाळु खरात यांनी यासंदर्भातील अहवाल शिक्षण संचालनालयाला सादर केला आहे.

# विद्यार्थ्यांना आपल्या मातृभाषेतूनच परिपूर्ण शिक्षण मिळते - जाधव

**विशाल देशमुख**

**जाफराबाद -** विद्यार्थ्यांना आपल्या मातृभाषेतूनच परिपूर्ण शिक्षण मिळते असे प्रतिपादन जाफराबाद पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक सतिश जाधव यांनी शनिवारी ता.१ केले. जाफराबाद शहरातील दौलतपुरा जिल्हा परिषद शाळेत आयोजित वार्षिक स्नेहसंमेलनाच्या उद्घाटन प्रसंगी ते बोलत होते. यावेळी सहाय्यक पोलीस निरीक्षक महादेव चव्हाण, निर्मल सीड्सचे महाव्यवस्थापक भगवानसिंग इंगळे, शिक्षक संघाचे तालुकाध्यक्ष विनोद कळंबे, वसंता शेवाळे, राजू कुमावत, गणेश ठाकूर, प्रकाश मिरगे, प्रल्हाद लोणकर, चेतन बायस, अनिल मोरे, नारायण वैद्य, अजीम शेख,बाळासाहेब वाघ यांच्यासह मान्यवरांची प्रमुख उपस्थिती होती. यावेळी पुढे बोलताना श्री जाधव म्हणाले की खाजगी शाळा आणि इंग्रजी माध्यमाच्या शाळा यांचे फॅड वाढले असले तरी सरकारी शाळांची क्रेझ देखील कमी झालेली नसून जिल्हा परिषदेच्या शाळेमध्ये विद्यार्थ्यांना शिक्षण देण्यासाठी उच्च शिक्षित आणि टीईटी उत्तीर्ण शिक्षक नेमलेले असतात असे ते म्हणाले. यावेळी विद्यार्थ्यांनी विविध देशभक्ती गीते लोकगीते हिंदी आणि मराठी चित्रपट गीतांवर बहारदार नृत्य सादर करून उपस्थित प्रेक्षकांची मने जिंकली. या कार्यक्रमासाठी तब्बल १ लक्ष ४० हजार रुपये इतक्या विक्रमी बक्षीसांचा वर्षाव झाला जाफराबाद तालुक्यातील जिल्हा परिषद शाळांच्या स्नेहसंमेलनातील बक्षिसाच्या रकमेचा हा उच्चांक समजला जातो. स्नेहसंमेलनासाठी डिजिटल स्क्रीनचा वापर करण्यात आला हे या स्नेहसंमेलनाचे वैशिष्ट्य ठरले. कार्यक्रमाचे सूत्रसंचलन विजय वैद्य, माधव शिंदे प्रेरणा मोरे, शिवम गोठवाल यांनी केले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी मुख्याध्यापक सुभाष काळे गणेश पठाडे, कौतिकराव फोलाने, प्रतिभा राजपूत, छाया पुंगळे,संगीता वायाळ, प्रज्ञा लोखंडे, शितल सांगळे आणि शाळा व्यवस्थापन समितीच्या सदस्यांनी परिश्रम घेतले.

*चौकट* वार्षिक स्नेहसंमेलन म्हटले की इंग्रजी शाळा आणि खाजगी शाळेतील भव्य स्टेज आणि झगमगाट पहायला मिळतो.या शाळांना ही मागे टाकत दौलतपुरा शाळेच्या वार्षिक स्नेहसंमेलनामध्ये करण्यात आलेला डिजिटल स्क्रीनचा



वापर हे या स्नेहसंमेलनाचे विशेष आकर्षण ठरले.स्पर्धेच्या युगात जिल्हा परिषद शाळा देखील सर्व प्रकारचे अध्ययन अनुभव देण्यात मागे नसल्याचा प्रत्यय या निमित्ताने आला.

**बक्षिसांचा उच्चांक**

वार्षिक स्नेहसंमेलन असले की उपस्थित पालक,प्रेक्षक विद्यार्थ्यांच्या कलागुणांना दात देत बक्षीस देत असतात. या जमा झालेल्या बक्षिसाच्या माध्यमातून जिल्हा परिषद शाळेच्या भौतिक विकासासाठी आवश्यक असणाऱ्या गोष्टींची पूर्तता शिक्षक त्या माध्यमातून करत असतात. दौलतपुरा जिल्हा परिषद शाळेच्या स्नेहसंमेलनात १ लक्ष ४० हजार एवढे विक्रमी बक्षीस जमा झाल्याने जाफराबाद तालुक्यातील जिल्हा परिषद शाळांच्या स्नेहसंमेलनातील बक्षिसांचा हा उच्चांक समजला गेला आहे.

# नळविहीरा जिल्हा परिषद शाळेत शाळा व्यवस्थापन समिती गठीत




**विशाल देशमुख**

**जाफराबाद -** नळविहीरा ता.जाफराबाद येथील जिल्हा परिषद उच्च प्राथमिक शाळेत शाळा व्यवस्थापन समिती अध्यक्षपदी शंकर भिकाजी गाडेकर यांची बिनविरोध फेरनिवड तर उपाध्यक्षपदी अनिल काकासाहेब मोरे यांची बिनविरोध निवड करण्यात आली. शाळा व्यवस्थापन समिती निवडण्यासाठी सोमवारी शाळेच्या प्रांगणात पालक सभेचे आयोजन करण्यात आले होते.उर्वरित समितीत सदस्य म्हणून सरला शिवाजी गाडेकर, डिगांबर महादु मोरे, संतोष लिंबाजी मोरे,वंदना प्रल्हाद गाडेकर,परमेश्वर रामेश्वर मोरे,कृष्णा दमोता जाधव, स्वाती ज्ञानेश्वर दानवे,विलास भगवान गाडेकर,ज्योती सुनिल गायकवाड,प्रतिभा दिनेश जाधव ,अरुण रामराव गाडेकर यांचा समावेश आहे.समिती निवडण्यासाठी सुनिल गायकवाड,विष्णू गाडेकर, अंबादास जाधव,बाबुराव क्षीरसागर,विष्णू लोखंडे,नंदू गाडेकर ,पवन गाडेकर,आकाश वाकुडे, अंकुश गाडेकर,परमेश्वर मोरे,शिवाजी गाडेकर यांचे सहकार्य लाभले तर यावेळी मुख्याध्यापक शिवहरी नागरे, दत्तू मुनेमाणिक, सुनिल अंभोरे, काशिनाथ उखर्डे,विनोद कळंबे, दिपक चव्हाण,ज्ञानेश्वर झगरे, मंजुषा बकतकार,पूजा गहेरवाल यांनी परिश्रम घेतले.

हे पत्र मालक, मुद्रक, प्रकाशक दीपक श्रीकृष्ण शेळके यांनी जगदंबा प्रिंटर्स, डबल जीन, जुना जालना ता. जि. जालना ४३१२०३ (महाराष्ट्र) येथे छापून कार्यालय दैनिक **युवा आदर्श**, शीतल किराणा जवळ, गांधीनगर, रोहणवाडी रोड, जालना. ता. जि. जालना ४३१२०३ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. **संपादक : दीपक श्रीकृष्ण शेळके मो.नं. ८३९००९८८८६, ८३९००४८८८६,** E-mail : yuva.aadarsh@gmail.com. RNI No. MAHMAR/2019/78282
Printer, Publisher and Owner Deepak Shrikrushna Shelke Printed At Jagdamba Printers, Plot no. 12 Dabal Jin, JALNA. Tq. Dist. JALNA 431203 (Maharashtra) Place of Publication Office Daily Yuva Aadarsh, Near Shital Kirana, Gandhinagar, Rohanwadi Road, JALNA, Dist JALNA 431203 (Maharashtra) Editor : Deepak Shrikrushna Shelke Mob no. 8390098886, 8390048886
E-mail : yuva.aadarsh@gmail.com RNI No. MAHMAR/2019/78282. अंकात प्रकाशित होणाऱ्या लेखाशी संपादक मंडळ सहमत असेलच असे नाही. लेखातील मजकुरासंदर्भातील सर्वस्वी जबाबदारी ही संबंधीत लेखकाचीच असेल.